नागपूर सुधार प्रन्यास

स्टेशन रोड, सदर, नागपूर ४४० ००१

क्रमांक :– कार्य.अभि./रचना/ ४५५८ नागपूर, दिनांक ६ /६/२०११

प्रति,

मा. जिल्हाधिकारी,

नागपूर.

विषय:– मौजा जामठा(प.ह.नं. ४२) तालुका नागपूर(ग्रामीण) स.क्र. १२/४ क्षेत्र २.०२ हे.आर. पैकी १.२१ हेक्टर आर जागा निवासी प्रयोजनार्थ अकृषक परवानगीबाबत.(रा.मा.क्र ४४०/एनएपी–३४/२००९–२०१०)

संदर्भ:– १. आपले कार्यालयीन पत्र क्रमांक प्रस्तुत/जिल्हाधिकारी/कावि–१७१५/२०१० दिनांक २७.०९.२०१० चा अर्ज..

२. नगररचना व मुल्यनिर्धारण विभाग शाखा कार्यालय नागपूर यांचे दिनांक ०२.०९.२०१० चे पत्र क्रमांक अकृषी/मौ.जामठा/ता. नागपूर(ग्रामीण) /ससंनाग/३३९५.

महोदय,

विषयांकित प्रकरणातील जागा निवासी वापरार्थ अकृषक करणेप्रकरणी संदर्भांकित पत्र क्रमांक २ चे अनूषंगाने प्रस्तावाची आखणी जागेवर झाल्यानंतर अर्जदारामार्फत संदर्भांकित पत्र क्रमांक १ अन्वये अर्ज प्राप्त झाला असून या प्रकरणात खालीलप्रमाणे कळविण्यात येते की,

मंजूर सुधारित प्रादेशिक योजना नागपूर प्रदेश नुसार(प्रभाग क्षेत्राचे बाहेर) विषयांकित जमीन कृषी विभागात समाविष्ट आहे. प्रस्तुत क्षेत्राचा बहुतांश भाग हा अस्तित्वातील गावठाणापासून ५०० मी परिक्षेत्राच्या आत स्थित आहे. उक्त योजनेतील तरतूदीनुसार सदर जागेवर निवासी वापर अनुज्ञेय आहे. सबब सदर जागा निवासी वापराकरीता अकृषक करण्याची शिफारस करण्यात येत आहे. सदर जमीन नागरी जमिन कमाल धारणा अधिनियम १९७६ चे परिसिमेत अंतर्भुत आहे. नागरी जमिन कमाल धारणा अधिनियम १९७६ चे कलम १०(३), १०(५),२० व २१ अन्वये कार्यवाही झालेल्या प्रकरणाचे यादीमध्ये उक्त स.क्र. चा समावेश दिसून येत नाही.

सदंर्भाधिन पत्रासोबत या कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रकरणातील अभिन्यासाची तांत्रिक छाननी केली असता, सदर अभिन्यासात आढळलेल्या किरकोळ दोषात सुधारणा करून अभिन्यासाला मा. सभापती नागपूर सुधार प्रन्यास यांनी दिनांक २४.०५.२०११ रोजी मंजूरी प्रदान केलेली आहे. उक्त जागेला निवासी वापराकरीता अकृषक करण्याकरीता खालील अटींवर शिफारस करण्यात येत आहे.

सदरहु प्रस्ताव फक्त अकृषक आदेश पारीत करण्याकरीता अंतीम समजण्यात यावा. यानंतर अर्जदाराला उक्त प्रकरणांत नागपूर सुधार प्रन्यासशी विकासाबाबत करारनामा तसेच M.R. & T.P. Act नुसार उर्वरित कार्यवाही करून घेणे बंधनकारक राहील.

१. अभिन्यासातील भूखंडाचा उपयोग फक्त "निवासी" वापराकरिताच करण्यात यावा. तसेच भविष्यात भुखंडाचे विभाजन करू नये.

२. सभोवतालचे मंजूर अभिन्यासातील रस्त्यांशी योग्यरितीने समन्वय साधणे आवश्यक आहे.

३. सर्व्हे क्र. १२/१(भाग),१२/३(भाग) च्या जागेतुन अभिन्यासात जाणाऱ्या पोच रस्त्याची